कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
14 Aug 2025 - Page 2

# कराड येथे 'सायबर सुरक्षा जनजागृती'-संजय शिंत्रे यांचे मार्गदर्शन




कराड - डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे आणि समाजाचे संरक्षण करण्यासाठी जनजागृती करणे अत्यंत गरजेचे आहे. याच उद्देशाने लायन्स क्लब कराड आणि शिवांजली ज्वेलर्स यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात क्विकहील फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमाला व्यासपीठ देण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. मोरेश्वर भालसिंग यांच्या सूचनेनुसार तसेच प्राचार्य डॉ. एस. जे. वाघ आणि कार्यक्रम संयोजिका डॉ. प्रियांका शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. संजय शिंत्रे (डीआयजी महाराष्ट्र सायबर, मुंबई) यांच्या हस्ते पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सर्जनशील पद्धतीने सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणारी माहिती पोस्टरच्या माध्यमातून सादर केली. श्री. शिंत्रे यांनी Think before you click (क्लिक करण्यापूर्वी विचार करा) या विषयावर प्रभावी भाषण केले. कार्यक्रमात कराडच्या उपविभागीय अधिकारी सौ. राजश्री पवार, लायन्स क्लबचे प्रांतपाल डॉ. विरेंद्र चिखले, तसेच अध्यक्ष सतीश मोरे यांचीही उपस्थिती होती.




यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेवर आधारित प्रभावी नुक्कड नाटक सादर केले. यात जढ्झ फसवणूक, लिंक बेटिंग, फसवे कॉल, डीपफेक, आणि जॉब फ्रॉड यांसारख्या वास्तवातील सायबर गुन्ह्यांचे प्रसंग रंगवण्यात आले. या नाटकात ऋतुजा हाके, श्री कवर, प्रतीक गुंजाळकर, सायली यादव, हर्षदा इनामदार, ओंकार बिडवे, ऋतुजा कोर्डे, प्रथमेश खंडागळे, पद्मनाभ माळवदे आणि प्राजक्ता पवार यांनी उत्कृष्ट अभिनयातून प्रत्येक घटनेचे परिणाम आणि त्यापासून बचाव करण्याचे मार्ग प्रभावीपणे मांडले. प्रेक्षकांनी या नाट्यप्रस्तुतीचे मनःपूर्वक कौतुक केले. कार्यक्रमाची खास बाब म्हणजे विद्यार्थ्यांचा उत्साह, संवादकौशल्य आणि टीमवर्क - त्यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून सायबर सुरक्षेचा संदेश जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवला.

नुक्कड नाटक संपल्यानंतर सर्व मान्यवर पाहुणे आणि प्रेक्षकांनी एकत्रितपणे सायबर प्रतिज्ञा म्हटली आणि डिजिटल सुरक्षिततेचा प्रसार करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लायन्स क्लब कराड, शिवांजली ज्वेलर्स, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड चे प्राचार्य डॉ. एस. जे. वाघ, सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा कार्यक्रम संयोजिका डॉ. प्रियांका शिंदे आणि क्विकहील फाउंडेशन यांचे आयोजक मंडळाकडून मनःपूर्वक आभार मानण्यात आले.